follow us : /rajdandlive

२५ वर्षे विश्वासार्हतेची

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

* RNI Regd. No. 72105/99 * वर्ष २६ * अंक ३४८ * सोमवार दि.१६ सप्टेंबर २०२४ * पाने ४ * किंमत ५/-

### गणेश विसर्जन सुरक्षेसाठी मुंबई पोलीस सज्ज

**मुंबई,** अनंत चतुर्दशी दिवशी गणेश विसर्जनासाठी मुंबई पोलीस सज्ज झाले आहेत. मुंबई पोलिसांचा तगडा बंदोबस्त विसर्जनादिवशी तैनात करण्यात येणार आहे. अत्यंत कडेकोट बंदोबस्तात गणपतीला निरोप देण्यात येईल. कोणतीही अप्रिय घटना घडू नये यासाठी मुंबई पोलीस डोळ्यात तेल घालून अलर्ट मोडवर राहणार आहेत.

विशेष पोलीस बंदोबस्त - गणपती विसर्जनाच्या बंदोबस्तासाठी पोलीस उपायुक्त दर्जाचे ४० वरिष्ठ अधिकारी, सहाय्यक पोलीस आयुक्त दर्जाचे ५० अधिकारी, त्याशिवाय २९०० पोलीस अधिकारी तसंच २० हजार ५०० पोलीस कर्मचारी असे सर्व मिळून २३ हजार ४९० पोलीस कर्मचारी, अधिकारी परिस्थितीवर लक्ष ठेवून असतील, अशी माहिती मुंबईचे सह पोलीस आयुक्त सत्यनारायण चौधरी

# धनगर आरक्षणावरून महायुतीत वाद?

## मुख्यमंत्र्यांच्या निर्णयावर अजित पवार गट नाराज



**मुंबई :** धनगर आरक्षणाबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या निर्णयावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आमदार व आदिवासींचे नेते नरहरी झिरवळ यांनी नाराजी व्यक्त केली आहे. ते म्हणाले, धनगरांचा अनुसूचित जातींमध्ये समावेश करण्याबाबतचा निर्णय घेण्यासाठी सरकारने समिती नेमली आहे. याबाबतचा निर्णय घेताना त्यांनी आम्हाला विश्वासात घ्यायला पाहिजे होतं. आदिवासी समाजाच्या प्रतिनिधींना त्या बैठकीला बोलवायला हवं होतं. आम्ही तिथे आमचे विचार मांडले असते. परंतु, आम्हाला विश्वासात न घेतल्यामुळे आगामी काळात राज्यात मोठा संशयकल्लोळ निर्माण होऊ सकतो.

नरहरी झिरवळ म्हणाले, आमच्या आरक्षणातच प्रत्येकाला आरक्षण हवं आहे. परंतु, हा हट्ट काही कामाचा नाही असं मला वाटतं. मध्यंतरी यासंदर्भात शिंदे समिती नेमली होती. त्यांनी आरक्षणाचा अभ्यास केला व नंतर ते प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं. परंतु, त्यावर तेव्हा निर्णय झाला नव्हता. आता पुन्हा एकदा धनगर समाजाचा आदिवासींच्या आरक्षणात समावेश करण्याबाबत विचार चालू आहे. मुख्यमंत्र्यांनी त्यासंदर्भात समिती नेमली आहे. परंतु, माझी राज्य शासनाला आणि मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की यासंदर्भातील निर्णय घेताना तुम्ही जसं त्यांना (धनगरांच्या नेत्यांना) बोलावलं होतं, त्याचप्रमाणे आमच्याशी देखील चर्चा करायला हवी होती.

झिरवळ म्हणाले, जर आमचे त्यांच्याशी लागेबंधे आहेत तर आम्हालाही त्या बैठकीला बोलवायला पाहिजे होतं. म्हणून मी पुन्हा एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुढच्या आठवड्यात भेटणार आहे. आमच्या संघटना, आमच्या समाजासाठी आयुष्य खर्च केलेल्या लोकांना घेऊन आमच्या समाजाचा विचार मुख्यमंत्र्यांसमोर मांडण्याचा माझा प्रयत्न राहील.

मुख्यमंत्र्यांनी आम्हालाही विश्वासात घ्यायला हवं होतं : झिरवळ

दरम्यान, यावेळी नरहरी शिरवळ यांना विचारण्यात आलं की मुख्यमंत्र्यांच्या या निर्णयावर तुम्ही नाराज आहात का? त्यावर झिरवळ म्हणाले, मला असं वाटतं की आम्हाला त्या बैठकीला बोलवायला हवं होतं. आमच्या खात्याचे मंत्री आहेत, त्यांना तरी बोलावलं असतं तर त्यांनी आमचे विचार, आमच्या मागण्या, आमचं म्हणणं तिथे मांडलं असतं. त्यांनी समिती नेमण्याचा जो निर्णय घेतला आहे त्या समितीत आमच्या लोकांना देखील समाविष्ट केलं असतं, किंबहुना आम्हाला विश्वासात घेतलं पाहिजे होतं, असं मला वाटतं. असं न केल्याने आगामी काळात संशयाचा एक मोठा कल्लोळ निर्माण होईल असं मला वाटतं

# देशात 'स्मार्ट सिटी' नव्हे तर 'स्मार्ट व्हिलेज'ची गरज

**पुणे :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या 'स्मार्ट सिटी' प्रकल्पानंतर आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी देशात 'स्मार्ट सिटी' नव्हे तर 'स्मार्ट व्हिलेज'ची गरज असल्याचे सांगितले. पुण्यात आयोजित 'सीओईपी अभिमान पुरस्कार' सोहळ्यात गडकरी पुढे म्हणाले की, कृषी क्षेत्राला जल, जमीन, जंगलच्या आधारावर नवीन तंत्रज्ञान दिले तर खूप काही करण्यासारखे आहे.

कृषी क्षेत्रात अनेक संधी : नितीन गडकरी म्हणाले, ''शेतकरी हा केवळ अन्नधान्याचा उत्पादक राहिलेला नसून तो ऊर्जादाताच्या भूमिकेतही शिरला आहे. कृषी क्षेत्रात देखील अनंत संधी दडलेल्या आहेत. आपली इंधनाची सध्याची आणि भविष्यातली देखील गरज भागवण्याची क्षमता कृषी उद्योगात आहे. ग्रामीण भागाच्या गरजा आणि गरजवंतांचा मानवी चेहरा केंद्रस्थानी ठेवून संशोधन करत तंत्रज्ञानाचा विकास झाल्यास, ग्रामीण भागातून येणारे लोंढे गावातच थांबतील. त्यांना स्थानिक पातळीवरच रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील''. कृषी आणि ग्रामीण भागाचा जीडीपी केवळ पंधरा ते सोळा टक्के आहे. ते योगदान वाढण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध करून देणे आपल्याला शक्य आहे. कृषी उद्योगाला ऊर्जा निर्मितीचाही पर्याय दिल्यास अधिक क्षमतेने प्रगती करता येईल, असा मला विश्वास आहे.

'स्मार्ट सिटी' सोबतच 'स्मार्ट व्हिलेज' : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या समोर ठेवलेल्या आत्मनिर्भर भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी निर्यात वाढवून आयात कमी करावी लागेल. इथेनॉल, बायोइथेनॉल आदी पर्यायांचा वापर करून पेट्रोल आणि डिझेलसाठी होणारा खर्च आपण वाचवू शकतो. तो पैसा देशाच्या इतर विकासाच्या कामात उपयोगात आणू शकतो. स्वदेशी, स्वावलंबन आणि स्वातंर्त्य हा आपल्या प्रगतीचा मूलमंत्र असला पाहिजे. 'स्मार्ट सिटी'

# ''गेलेली सत्ता पुन्हा खेचून आणणार'', उद्धव ठाकरे यांचा महायुतीला इशारा

**शिर्डी :** शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आज शिर्डी आणि छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूवीर उद्धव ठाकरे यांचा हा दौरा महत्वाचा मानला जात आहे. या दौऱ्यावेळी त्यांनी जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी सुरु असलेल्या महाअधिवेशनाला हजेरी लावली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी महायुतीवर हल्लाबोल केला. तसेच गेलेली सत्ता पुन्हा येईल. गेलेली सत्ता पुन्हा खेचून आणणार आहे, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी महायुतीच्या नेत्यांना दिला आहे.

उद्धव ठाकरे काय म्हणाले?

''मी देखील या ठिकाणी आलो आहे. मला सत्तेची पर्वा नाही. मला तुमच्या आयुष्याची चिंता आहे. मला तुमच्या कुटुंबाची पर्वा आहे. सत्ता येत असते आणि सत्ता जात असते. गेलेली सत्ता पुन्हा येणार आहे. गेलेली सत्ता पुन्हा खेचून आणणार आणि सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे. मात्र, एक लक्षात घ्या, एकजूट महत्त्वाची आहे. याआधी एकदा जुनी पेन्शन योजनेसाठी तुम्ही सर्वजण नागपूरला आला होतात. मात्र, तुमच्यापैकी एक घटक तिकडे गेला आणि तुमच्या आंदोलनावर पाणी ओतलं. जे फोडाफोडीचं राजकारण शिवसेनेबरोबर करण्यात आलं. हे जुनी पेन्शन योजनेसाठी आंदोलन करणाऱ्यांबरोबर देखील करतील. हे सरकार गेल्यात जमा आहे. खरं तर महायुतीच्या नेत्यांना सत्तेशिवाय उपाशी ठेवलं पाहिजे, असा निर्धार करायला हवा'', असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी महायुतीवर केला.

''विधानसभेची निवडणूक जवळ येईपर्यत ज्यांना आपली बहीण माहिती नव्हती. त्यांनी लाडकी बहीण योजना आणली. आता दोन महिन्यांनी निवडणुका आहेत. मी तुम्हाला वचन देतो की, दोन महिन्यांनी आपलं सरकार आलं तर मी तुमची जुनी पेन्शन योजनेची मागणी मान्य करतो. आता मी ही घोषणा केल्यानंतर महायुतीला घाम फुटेल आणि ते

### तृतीयपंथीयाच्या खुनाचा तपास सहा तासांत उघड

**सातारा :** प्रेमसंबंधातून तृतीयपंथीयाने लग्नाचा तगादा लावल्याने त्याचा गळा आवळून खून केला. नंतर वीजवाहक तारेने मृतदेहाच्या कंबरेस वजनदार दगड बांधून विहिरीत टाकून दिल्याची धक्कादायक घटना म्हसवड (ता. माण) येथे घडली.मृत तृतीयपंथी राशी ऊर्फ राहुल अजिनाथ घुटुकडे (वय २५) याच्या खुनाचा तपास सहा तासांत लावण्यात म्हसवड पोलिसांना यश आले. याप्रकरणी समाधान विलास चव्हाण (रा. दिवड, ता. माण) यास पोलिसांनी अटक केली.

मसाईवाडी (म्हसवड) गावच्या हद्दीतील एका विहिरीत अनोळखी मृतदेह कुजलेल्या स्थितीत दिसल्याचे म्हसवड पोलीस ठाण्यात कळवले गेले.मृतदेहाची ओळख पटविणे आव्हानात्मक असताना पोलिसांनी हातावर गोंदलेल्या नावाचे आधारे मृताच्या नातेवाइकांचा शोध घेतला. ही माहिती समाजमाध्यमावर प्रसारित केली. त्या वेळी मृताच्या नातेवाइकांचा संपर्क झाला. त्या वेळी मृत व्यक्ती मोटेवाडी (ता. माण) येथील तृतीयपंथी राशी ऊर्फ राहुल असल्याचे निष्पन्न झाले.

# कांद्याच्या दरात ५०० रुपयांनी वाढ किमान निर्यात मूल्य हटवले; भाव वधारले

**अहमदनगर :** केंद्र सरकारने कांद्यावरील ५५० डॉलर प्रतिटन किमान निर्यात मूल्य (मिनिमम एक्स्पोर्ट प्राइज) हटवत निर्यात शुल्कामध्ये २० टक्के कपात करताच कांद्याच्या दरात वाढ झाली आहे. जिल्ह्यातील बाजारपेठांत कांद्याच्या दरात शनिवारी (दि. १४) सरासरी प्रति क्विंटल ५०० रुपयांनी वाढ झाल्यानेकांदाउत्पादकांना दिलासा मिळाला आहे. मविआच्याच गळ्यात टाका 'फेक नरेटिव्ह'; नड्डा यांचे भाजपच्या बैठकीत आदेशकेंद्र सरकारने कांद्यावरील ५५० डॉलर प्रतिटन किमान निर्यात मूल्य (मिनिमम एक्स्पोर्ट प्राइज) हटवत निर्यात शुल्कामध्ये २०



टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला. वाणिज्य मंत्रालयाचे परदेश व्यापार महासंचालक संतोष कुमार सारंगी यांच्या स्वाक्षरीचा अध्यादेश शुक्रवारी (दि. १३) जारी झाला. सरकारने कांद्यावरील निर्यात मूल्याची अट काढून तसेच निर्यात शुल्कही निम्मे कमी करून २० टक्क्यांवर आणल्याने निर्यातदारांना हव्या त्या किमतीतकांदानिर्यातीची संधी आहे. हा निर्णय घोषित होताच लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याच्या दरात चारशे रुपयांची वाढ झाली. मनमाडला कांद्याच्या दरात प्रतिक्विंटल मागे ५०० ते ६०० रुपयांची वाढ झाली. चांदवडला कांद्याच्या दरात ३०० रुपयांची, तर सिन्नरला ४०० रुपयांची वाढ झाली.नगरमध्ये विक्रमी ५५०० भावनगर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नेप्ती उपबाजारातील कांदा मार्केटमध्ये शनिवारी उच्च प्रतीच्या गावरान कांद्याला क्विंटलला तब्बल ५५०० रुपये भाव मिळाला.गेल्या अनेक दिवसांतील हा उच्चांकी भाव असल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ऐन गणेशोत्सवात एकप्रकारे गणरायचा पावला आहे.नेवासा बाजार समितीच्या घोडेगाव येथील उपआवारात कांद्याच्या भावामध्ये शनिवारी प्रतिक्विंटल पाचशे ते सातशे रुपयांची वाढ होऊन भाव पाच हजार दोनशे रुपयांवर पोहोचला.

# गणेशोत्सवात झेंडू दराने गाठली शंभरी

## पावसामुळे झेंडूच्या उत्पादनात घट

**सातारा :** गणेशोत्सवापूर्वी चाळिस रुपये किलो असा दर असलेल्या झेंडूने गणेशोत्सवात मात्र घाऊक बाजारात शंभरी गाठली आहे. उत्सवात दर फुलल्यामुळे झेंडू उत्पादकांना गणराय पावला आहे. वाढीव दरामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आहे. 'गोल्डन यलो' आणि 'गोल्डन ऑरेंज' जातीची झेंडूची फुले ही किरकोळ बाजारात गणेशोत्सवात ३०० रुपये किलो दराने विकली गेली.गणेशोत्सवापूर्वी बाजारात झेंडूच्या फुलाचे दर पडल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरील चिंता दिसून येत होती. यंदा सतत पाऊस असल्याने झेंडूची लागवड कमी झाली आहे. शिवाय ज्यांनी लागवड केली त्यांचा उगवलेला झेंडूदेखील सततच्या पावसामुळे खराब झाला आहे. दुसरीकडे ढगाळ वातावरणामुळे यंदा झेंडूवर रोगाचा प्रादुर्भावदेखील अधिक प्रमाणात अहे.

दरम्यान ज्या भागात पाऊस कमी झाला त्या ठिकाणी झेंडुचे उत्पादन चांदले आले. या शेतकऱ्यांचा माल सध्या बाजारात येत आहे. सध्या बाजारात लाल पिवळ्या रंगांची झेंडूची फुले आहेत. यामध्ये लाल -केशरी रंगात ऑरेंज, कलकत्ता, जंबो आदी जाती आहेत; तसेच पिवळ्या रंगात 'स्मार्ट यलो', कांचन, श्रावणी जातीची फुले विक्रीसाठी आली आहेत. पिवळ्या झेंडूचा दर शंभर रुपये किलोपर्यंत पोहचला आहे.



### कृत्रिम फुलांची स्पर्धा

**सणासुदीच्या दिवसांत देवाला हार आणि सजावटीसाठी फुलांचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येतो. उत्सव काळात वाढणारे दर यामुळे अलीकडे काही लोक प्लॅस्टिकच्या कृत्रिम फुलांचे हार, माळा याचा अधिक वापर करतात. जास्त दिवस टिकत असल्याने लोकांचा त्यांकडे कल वाढला आहे. सध्या बाजारात रंगीबेरंगी कृत्रिम फुलांची रेलचेल आहे. त्यांनी खऱ्या फुलांपुढे स्पर्धा निर्माण केली आहे.**

**पाऊस जास्त झाल्यामुळे दादर फूल मार्केटमध्ये मालाची आवक कमी आहे. रोगाचा प्रादुर्भाव असल्याने चांगल्या दर्जाची फुले येत नाहीत. चांगल्या दर्जाच्या झेंडूला दर देखील चांगला आहे. महाराष्ट्रापेक्षा बंगळुरूहून अधिक माल बाजारात येत आहे. सध्या झेंडूच्या पिवळ्या वाणापेक्षा केशरी वाणाला अधिक दर आहे. दसरा-दिवाळीलादेखील दर टिकून राहतील अशी शक्यता आहे.**

**- रमेश शिंदे, फूल व्यापारी, मीनाताई ठाकरे फूल मार्केट, दादर**

मागणी अधिक असल्याने केशरी रंगाच्या झेंडूचा दर किलोला शंभरी पार करत सव्वाशे झाला आहे. शेवंतीच्या फुलाचीसुद्धा आवक आहे. शेवंतीचा दर सध्या दीडशे ते दोनशे रुपयापर्यंत आहे. घाऊक बाजारात पुणे व मुंबई येथे सातारा, सांगली येथून जास्त आवक आहे. यंदा महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण जास्त असल्याने फूलबागांचे नुकसान झाले आहे. महाराष्ट्राच्या तुलनेत कर्नाटकमधील बंगळुरूला जेमतेम पाऊस असल्याने बागा वाचल्या आहेत. पुण्या-मुंबईच्या फुलांच्या घाऊक बाजारात बंगळुरूची फुले सध्या मोठ्या प्रमाणात येत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. स्थानिक फुलांच्या दराला परप्रांतांतील फुलांची स्पर्धा करावी लागत आहे. जिल्ह्यात सातारा, वाई, खटाव, माण, फलटण, कोरेगाव, खंडाळा, जावळी, कराड तालुक्यांत शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात झेंडूची लागवड करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु पाणी साचणाऱ्या शेतामध्ये यंदा सततच्या पावसाने उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. पावसाने उघडीप दिल्याने दसरा, दिवाळी डोळ्यासमोर ठेवून शेतकरी झेंडूची चांगलीच काळजी घेत आहेत. दर मिळण्याच्या आशेने काही नव्याने लागवड करण्याच्या तयारीत आहेत.

# शेतकरी दाम्पत्याचा विजेचा धक्का लागून जागीच मृत्यू

**सोलापूर :** जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील दहिटणे गावच्या शेतकरी दाम्पत्याचा विजेचा धक्का लागून जागीच मृत्यू झाला आहे. शनिवारी सकाळी सव्वा नऊ वाजताची ही घटना आहे. अंबादास साळुंखे (वय ५५), कलावती साळुंखे (वय ४५) दोघे रा. स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्यासमोर, अक्कलकोट असे मृत व्यक्तींची नावे आहेत. मयत दाम्पत्याच्या पश्चात मुलगा, मुलगी असा परिवार आहे.

सदर घटनेप्रकरणी अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात महावितरण कंपनीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महावितरणे मृतांच्या नातेवाईकांना तत्काळ आर्थिक मदत देण्याचे लेखी आश्वासन दिले आहे.

अधिक माहिती अशी की, अंबादास नामे शेतकरी हे घरामागील शेतात बाजरीवरील पाखरं हाकलण्यासाठी जात होते. शेतात महावितरणच्या तारा तुटून पडल्या होत्या. मात्र तारा तुटल्याचे अंबादास यांच्या लक्षात आले नाही. शेतात घाईघाईत जात असताना तुटलेल्या तारेचा धक्का अंबादास यांना लागल्याने ते जागेवर मृत्यूमुखी पडले.

नवऱ्याला वाचविण्यासाठी बायको गेली अन्ष

पती अंबादास विजेच्या धक्क्याने तडफडत असताना पत्नी कलावती या त्यांना वाचविण्यासाठी गेल्या. अंबादास यांना तारांपासून बाजूला करण्याचा प्रयत्न त्या करू लागल्या. परंतु त्यांनाही विजेचा जोराचा धक्का बसून त्यांचाही सदर घटनेत मृत्यू झाला. नातेवाईक आणि गावकऱ्यांचा आक्रमक पवित्रा, महावितरणविरोधात प्रचंड रोष

गावातील शेतकरी दाम्पत्याचा विजेच्या तारांनी धक्का बसून मृत्यू झाल्याची घटना माहिती पडल्यानंतर नातेवाईकांसह गावातील नागरिकांनी आक्रमक पवित्रा घेतला. दहिटने गावकऱ्यांनी वीज वितरण विभागाविरोधात संताप व्यक्त करत मृत दाम्पत्याचे मृतदेह घेऊन वीज वितरण

### धनगर समाजाला आरक्षण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई :** धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आरक्षण मिळावे, यासाठी सकारात्मक पावले उचलली जातील. ही सर्व प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत टिकणारी असावी आणि यात अन्य कुठल्याही समाजावर अन्याय होणार नाही, असे प्रयत्न केले जातील, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले.

धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळावे यासाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सकल धनगर जमात समन्वय समितीच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे बैठक झाली.

यावेळी मुख्यमंत्यांनी उपोषणकर्त्या आंदोलकांशी दुरध्वनीवरुन संपर्क साधला व त्यांची विचारपूस देखील केली.

बैठकीस राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. आय. एस. चहल, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, सामाजिक न्याय विभागाचे सचिव गणेश पाटील उपस्थित होते. इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, प्रधान सचिव विनिता वेद-सिंघल दृकश्राव्य माध्यमातून उपस्थित होते.

# मध्यावधीची चर्चा का?

बिहार हे देशाच्या राजकारणाचे केंद्रबिंदू मानले जाते. येथून वाहणारे राजकीय वारे संपूर्ण देशाचे वातावरण बदलून टाकतात. केंद्रातील सध्याचे सरकारही बिहारच्या पाठिंब्यावर चालत आहे. सध्याच्या परिप्रेक्ष्यात बिहारच्या राजकारणाबद्दल बोलायचे झाले, तर येथे मध्यावधी निवडणुकांची जोरदार चर्चा आहे. अर्थात अशी चर्चा होण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. गेल्या वर्षभरात ही चर्चा अनेकदा झाली आहे; परंतु आता ज्या पद्धतीने भारतीय जनता पक्षाचे नेतेही बिहार विधानसभेच्या मध्यावधी निवडणुकीची चर्चा करीत आहेत, ते पाहता लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशाची पुनरावृत्ती करण्याचा मुख्यमंत्री नितीशकुमार यांचा प्रयत्न आहे, अशी चर्चा सुरू झाली आहे; परंतु लोकसभेच्या निवडणुकीत मतदार वेगळा कौल देतात आणि विधानसभेच्या निवडणुकीत वेगळा असे बऱ्याचदा होत असते. गेल्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष प्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला चांगले यश मिळाले होते; परंतु त्यानंतर दीड वर्षांनी झाल्या निवडणुकीत संयुक्त जनता दल, भाजप आणि मित्रपक्षांचे सरकार आले असले, तरी नितीश कुमार यांच्या जागा फारच कमी झाल्या. त्याची पुनरावृत्ती होऊ नये, म्हणून तर विधानसभेच्या निवडणुका एक वर्ष अगोदरच घेण्याचे घाटत आहे, असे सांगितले जाते. लोकसभा निवडणुकीनंतर बिहारमध्ये विधानसभेच्या अनेक जागा रिक्त झाल्या. या जागांवर पोटनिवडणूक होणार होती, मात्र आजपर्यंत या पोटनिवडणुकीबाबत कोणतीही अधिसूचना काढण्यात आलेली नाही. यामुळे बिहारमध्ये विधानसभा निवडणुका लवकर होऊ शकतात, असे संकेत मिळत आहेत. महाराष्ट्र आणि दिल्लीसोबतच बिहारमध्येही विधानसभा निवडणुका होऊ शकतात. मुख्यमंत्री नितीश कुमारही त्यास अनुकूल असल्याचे दिसत आहे. नितीश कुमार यांचा कार्यकाळ नोव्हेंबर २०२५ पर्यंत असला, तरी नियोजित वेळेपूर्वी निवडणुका व्हाव्यात अशी त्यांची इच्छा आहे. भाजपनेही निवडणुकीत उतरण्याचे ठरवले आहे. इतर सर्व पक्षांच्या राजकीय घडामोडीही याचे संकेत देत आहेत. राजकीय समीकरणे जुळवण्याचे काम सुरू झाले आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत संयुक्त जनता दलाच्या कामगिरीप्रमाणे आगामी विधानसभा निवडणुकीतही जागांची तीच टक्केवारी कायम राहावी, अशी नितीश कुमार यांची इच्छा आहे. सध्या नितीश कुमार यांचा संयुक्त जनता दल हा बिहार विधानसभेत तिसऱ्या क्रमांकांचा पक्ष आहे. त्यामुळे नितीश कुमार दुखावले आहेत. गेल्या निवडणुकीत लोक जनशक्ती पक्षाने ज्या पद्धतीने संयुक्त जनता दलाच्या मतपेढीला धक्का दिला, ते नितीश कुमार अजूनही विसरलेले नाहीत.


आगामी विधानसभा निवडणूक अनेक अर्थाने खास असणार आहे. बिहारमधील प्रमुख विरोधक असलेल्या राष्ट्रीय जनता दलानेही तयारी जोरात सुरू केली आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत या पक्षाला सर्वाधिक जागा होत्या. गेल्या लोकसभा निवडणुकीतही मागच्या लोकसभा निवडणुकीपेक्षा राष्ट्रीय जनता दलाने विरोधकांची चांगली मोट बांधून दहा जागा मिळवल्या. आगामी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय जनता दल त्याच धर्तीवर जातीच्या आधारावर उमेदवारांना तिकीट देणार हे स्पष्ट झाले आहे. सर्व जातींना या पक्षाचे नेते तेजस्वी यादव यांनी एकत्र आणण्यास सुरुवात केली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत अनेक राजकीय समीकरणे कोलमडणार आहेत. आगामी बिहार विधानसभा निवडणुकीत कोणता पक्ष किती जागा जिंकतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. कोणत्या पक्षाच्या जातीनिहाय चालीला जनता साथ देईल, हेही पाहावे लागेल. बिहारमध्ये भाजप आणि संयुक्त जनता दलाचे मूळ मतदार मोठ्या संख्येने स्वर्ण, वैश्य आणि ईबीसी आहेत. त्यांची संख्याही खूप जास्त आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे मूळ मतदार त्यांच्यावर नाराज असल्याचे काही दिवसांपासून दिसून येत आहे. त्याची प्रचिती गेल्या लोकसभा निवडणुकीतही दिसून आली. त्यामुळे 'एनडीए'ला अनेक जागांवर पराभवाला सामोरे जावे लागले. अनेक जातींकडे दुर्लक्ष केल्यामुळे 'एनडीए'चे नुकसान झाले आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीला तीच चूक पुन्हा करायची नाही. आगामी विधानसभा निवडणुकीत किमान स्वत:च्या मूळ मतदारांना आकर्षित करण्यावर या आघाडीचा भर आहे. त्यांची नाराजी दूर करण्यासाठी त्यांचा विश्वास परत मिळवण्यासाठी या आघाडीतील पक्षांना नव्याने प्रयत्न करावे लागतील. बिहारमध्ये नितीश कुमार यांच्या विरोधात 'अँटी इन्कम्बन्सी' दिसून येत आहे. जनतेला आता नितीश कुमार यांच्या जागी दुसरा चेहरा पाहायचा आहे. आता संयुक्त जनता दलामध्येही नेतृत्वासाठी नव्या चेहऱ्याचा विचार केला जात आहे. त्याचवेळी भाजपचा एकही प्रमुख चेहरा दिसत नाही. बिहारमध्ये आजपर्यंत भाजपचा एकही मुख्यमंत्री नसण्यामागे हेही एक प्रमुख कारण आहे. जनतेचा भ्रमनिरास झाला आहे. तेजस्वी हे आता राष्ट्रीय जनता दलाचे भावी नेते आहेत. त्यांना चांगले भविष्य असल्याचे सांगितले जाते. या पार्श्वभूमीवर नितीश कुमार यांना आगामी काळात लोकांमध्ये नवा चेहरा आणावा लागेल. अन्यथा, संयुक्त जनता दलाचे मतदार हळूहळू दुसरा पर्याय शोधतील. जास्त जागा मिळवण्याचे मोठे आव्हान संयुक्त जनता दलापुढे आहे. बिहारमध्ये ईबीसी जातींची लोकसंख्या ३६ टक्के आहे. या व्होट बँकेच्या जोरावर २००५ च्या निवडणुकीत नितीश कुमार सत्तेवर आले. लव-कुश हे नितीश कुमारांचे मूळ मतदार मानले जातात. सध्या सर्वच पक्षांची नजर आपल्या मूळ मतदारांसह या जातींच्या व्होटबँकेकडे लागली आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीतही राष्ट्रीय जनता दलाने कुशवाह यांना १० जागा दिल्या होत्या, त्यामुळे 'एनडीए'च्या जागांमध्ये घट झाली होती. लोकसभेत राष्ट्रीय जनता दलाने अभय कुशवाह यांना आपला नेता घोषित करून ही व्होट बँक आपल्या मागे ठेवण्याची चाल खेळली आहे. त्याचबरोबर भाजपवर नाराज असलेल्या सवर्ण जातींना आपलेसे करण्याचाही तेजस्वी यांचा प्रयत्न आहे. वैश्य जातीच्या नाराजीचा डंका भाजपने मागील निवडणुकीतही पाहिला आहे. आता राष्ट्रीय जनता दलाने या नाराज व्होट बँकांना आकर्षित करण्याची व्यूहनीती आखली आहे. यात ते यशस्वी होताना दिसत आहेत.

निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर सध्या बिहारमध्ये राजकारणाच्या मैदानात उतरले आहेत. तळागाळातील अनेक गावांतील लोकांशी ते बोलत आहेत. या अनुषंगाने त्यांनी पक्ष स्थापनेची प्रक्रियाही सुरू केली आहे. दोन ऑक्टोबर रोजी 'जन सूरज' या नावाने पक्षाची औपचारिक घोषणा केली जाईल. बिहारच्या एक कोटी जनतेला घेऊन पक्ष स्थापन करण्याचा दावा त्यांनी केला आहे. पाटण्यामध्ये त्यांनी हजारो लोकांच्या अनेक जाहीर सभाही घेतल्या आहेत. त्यात त्यांनी आपली ताकद दाखवून दिली आहे. मुस्लिम समाजातही त्यांची लोकप्रियता वाढली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत हा पक्ष तिसरी आघाडी म्हणून लोकांमध्ये असेल, असे मानले जात आहे. प्रशांत किशोर यांनी बिहारमधील सर्व २४३ जागांवर उमेदवार उभे करण्याचा दावा केला आहे. अशा स्थितीत बिहारमधील राजकीय वातावरण बदलताना दिसत आहे. परिवर्तनाच्या या वाऱ्याने सर्वच पक्ष त्रस्त झालेले दिसत आहेत. राष्ट्रीय जनता दलाने त्यांना भाजपचे एजंट असल्याचे म्हटले आहे. जनता प्रशांत किशोर यांच्या पाठीशी उभी असल्याचे दिसून येत आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत ते मोठी शक्ती म्हणून उदयास येऊ शकतात. ते २०२५ च्या विधानसभा निवडणुकीत आपले सरकार बनवणार असल्याची बढाई मारत आहेत. अशा स्थितीत मध्यावधी निवडणुका घेतल्या, तर किमान प्रशांत किशोर या विधानसभा निवडणुकीत आपला खेळ खराब करू शकणार नाहीत, असे नितीश कुमार यांना वाटते. जाती, जमातीचे राजकारण करणाऱ्या राष्ट्रीय जनता दलाने आता दुसरे समीकरणही जोडण्यास सुरुवात केली आहे. आता राष्ट्रीय जनता दलाने खलाशांची व्होट बँक आपल्या बाजूने करण्याचा प्रयत्न करत आहे. बिहारमधील डझनाहून अधिक छोट्या जातींची व्होट बँक मुकेश साहनी यांच्याकडे आहे. या जातींच्या मतांवर राष्ट्रीय जनता दलाचा डोळा आहे. साहनी यांना उपमुख्यमंत्रिपदाचे दावेदार ठरवून त्यांचा पाठिंबा मिळवण्याचा राष्ट्रीय जनता दलाचा प्रयत्न आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत साहनी यांच्या 'व्हीआयपी' पक्षाला एकही जागा मिळवता आली नसली, तरी मतदानाची टक्केवारी चांगली राहिली आहे. अशा स्थितीत साहनी यांचे मनोबलही उंचावले आहे. खलाशांना आरक्षण देण्याच्या मागणीबाबत टोलवाटोलवी केली जात आहे. केंद्र सरकार आपल्या मागण्या कोठूनही पूर्ण करू शकत नाही हे त्यांना माहीत आहे. अशा स्थितीत ते तेजस्वी यादव यांच्यासोबत नवे जातीय समीकरण तयार करत आहेत; मात्र लोकसभा निवडणुकीपूर्वी नितीश कुमार 'एनडीए'मध्ये परतले आणि लोकसभा निवडणुकीत संयुक्त जनता दलाने १२ जागा जिंकल्या. नितीश कुमार यांनी 'एनडीए'ला तीस जागा मिळवून दिल्या आहेत. २०१९ च्या तुलनेत नऊ जागा कमी आहेत; पण उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, पश्चिम बंगाल, हरियाणा यांसारख्या राज्यांमध्ये भाजपची खराब कामगिरी पाहिली, तर त्या तुलनेत बिहारमध्ये भाजपने खूपच चांगली कामगिरी केली आहे. २०१९ मध्ये ज्यांचे खातेही उघडले नव्हते, त्या राष्ट्रीय जनता दलाने या वेळी चार जागा जिंकल्या आहेत. महाआघाडीने ९ जागा जिंकल्या असून काँग्रेसला पाठिंबा देणारा एक अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे. त्यानुसार महाआघाडीच्या दहा जागा आहेत. लोकसभा निवडणुकीतील मतांच्या टक्केवारीत राष्ट्रीय जनता दल हा सर्वात मोठा पक्ष आहे. त्यानंतर भाजप आणि नंतर संयुक्त जनता दलाला मते मिळाली. या पार्श्वभूमीवर नितीश कुमार यांच्या पक्षात गोंधळाची स्थिती आहे. एकीकडे नितीश कुमार यांचे महत्त्व आणि उंची दोन्ही वाढली आहे. आता केंद्रात सरकार टिकण्यासाठी भाजपला नितीश कुमारांची गरज आहे. अशा स्थितीत नितीश कुमार विधानसभा निवडणुका लवकर घेण्याची तयारी करीत असून, स्थानिक भाजप नेते त्याला तयार आहेत. नितीश कुमार खरेच ही खेळी करतात, की विरोधकांना कात्रजचा घाट दाखवतात, हे पाहायचे.

# गणेशोत्सवानंतर धारावीकर अदानीविरोधात रस्त्यावर उतरणार

**मुंबई :** धारावी पुनर्विकासाचे गुपचूप भूमिपूजन केल्याने अदानी समूह, धारावी रिडेव्हलपमेन्ट प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड (डीआरपीपीएल) विरोधात धारावीकरांमध्ये रोष पसरला आहे. या पार्श्वभूमीवर अदानी समूहाविरोधातील आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय धारावी बचाव आंदोलनाने घेतला आहे. त्यानुसार आठवड्याभरात धारावी बचाव आंदोलनाची एक महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. या बैठकीत आंदोलनाची रूपरेषा निश्चित करण्यात येणार आहे. सर्व मुंबईकरांना एकत्रित करून मोर्चा काढण्याचे धारावी बचाव आंदोलनाचे नियोजन आहे. याबाबतच निर्णय धारावी बचाव आंदोलनाच्या बैठकीत घेण्यात येणार आहे.

अदानी समुहाच्या माध्यमातून धारावीचा पुनर्विकास करण्यास धारावीकरांनी सुरुवातीपासूनच विरोध केला आहे. त्याचवेळी ३५० ऐवजी ५०० चौरस फुटांच्या घराची धारावीकरांनी मागणी केली आहे.



राज्य सरकार वा धारावी पुनर्विकास प्रकल्पाने (डीआरपी) या मागणीवर अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या अंतिम आराखड्यासही अद्याप मान्यता मिळालेली नाही. असे असताना बेकायदेशीररित्या, लपूनछपून अदानी समूहाने, डीआरपीपीएलने गुरुवार, १२ सप्टेंबर रोजी रेल्वेच्या जागेवरील रेल्वे कर्मचाऱ्यांच्या इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन केल्याचा आरोप धारावी बचाव आंदोलनाचा आहे. दरम्यान, भूमिपूजनाचा सोहळा उधळण्यासाठी धारावी बचाव आंदोलनाने ११ सप्टेंबर रोजी लाक्षणिक उपोषण सुरू केले होते. या उपोषणाचा धसका घेत गुरुवारचे भूमिपूजनाचा कार्यक्रम रद्द करण्यात आल्याचे डीआरपीने अधिकृतपणे पोलिसांना कळविले होते. त्यामुळे पोलिसांच्या मध्यस्थीनंतर धारावी बचाव आंदोलनाने आपले लाक्षणिक उपोषण मागे घेतले होते. मात्र उपोषण मागे घेतल्यानंतर दुसऱ्या दिवशी, गुरूवारी सकाळी १०.३० वाजता डीआरपीपीएलने गुपचूप भूमिपूजन केले. यासंबंधीची अधिकृत घोषणाही केली.

### वसाहतीच्या पुनर्विकासासाठी पुनर्निविदा

डीआरपीपीएलच्या कृतीवर धारावीकरांनी जोरदार टीका केली आहे. लपूनछपून भूमिपूजन का करण्यात आले, असा प्रश्न उपस्थित करून आता अदानी आणि डीआरपीपीएलविरोधातील आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय धारावी बचाव आंदोलनाने घेतला आहे. गणेशोत्सवानंतर धारावीकर मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरणार असल्याची माहिती धारावी बचाव आंदोलनाकडून देण्यात आली. शुक्रवारी एक बैठक आयोजित करून त्यात आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात येणार आहे. धारावीकरच नव्हे तर मुलुंड, कुर्ल्यासह ज्या ज्या मुंबईकरांचा अदानीला विरोध आहे त्या सर्वांना एकत्र करून लवकरच एक मोर्चा काढण्यात येईल, असेही धारावी बचाव आंदोलनाकडून सांगण्यात आले.

# मविआच्याच गळ्यात टाका 'फेक नरेटिव्ह'; नड्डा यांचे भाजपच्या बैठकीत आदेश

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने आपल्याविरुद्ध फेक नरेटिव्ह सेट केले, आता असे नरेटिव्ह काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्याच गळ्यात टाकण्याची वेळ आली आहे, आपल्याकडे मुद्दे भरपूर आहेत त्यावरून मविआला घेरा, आंदोलने करा आणि त्याचवेळी केंद्र सरकारने अलीकडे घेतलेले निर्णय लोकांपर्यंत पूर्ण ताकदीने पोहोचवा, असे आदेश भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी शनिवारी एका बैठकीत दिले.



राज्यातील भाजप नेत्यांची बैठक नड्डा यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर घेतली. यावेळी फडणवीस, केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, पीयूष गोयल, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, रावसाहेब दानवे, पंकजा मुंडे आदी नेते उपस्थित होते.

गेल्या तीन महिन्यांत प्रदेश भाजपने केलेली आंदोलने, निवडणुकीच्या दृष्टीने केलेली तयारी या बाबतची माहिती नड्डा यांना यावेळी देण्यात आली. निवडणुकीच्या आधी प्रदेश भाजपने काय करणे अपेक्षित आहे ते नड्डा यांनी सांगितले. मोदी पंतप्रधान झाल्यानंतर घटना बदललेली नाही हे जनतेला जाऊन सांगा. त्याचवेळी कांदा, बासमतीवरील निर्यातमूल्य हटविणे, खाद्यतेलाच्या आयातीवर शुल्क आकारण्याचा केंद्र सरकारने काल घेतलेला निर्णय शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अभियान राबविण्याचे निर्देश नड्डा यांनी दिले.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी आरक्षणाबाबत केलेल्या विधानावरून काँग्रेस आरक्षणविरोधी असल्याचे स्पष्ट होते, असे सांगून नड्डा म्हणाले की, आरक्षणाचा लाभ मिळत असलेल्या समाजापर्यंत पोहोचून कार्यकर्त्यांनी हे सांगितले पाहिजे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून (१७ सप्टेंबर) सेवा पंधरवडा साजरा करण्याचा निर्णय भाजपने घेतला आहे. त्या काळात फेक नरेटिव्हवरून मविआला घेरले जाणार आहे. निवडणुकीबाबत चर्चाशिंदेसेना आणि अजित पवार गटाला सोबत घेऊनच आपल्याला निवडणुकीला सामोरे जायचे आहे.

# घराचा ३५ वर्षांपासून रखडलेला प्रश्न लागला मार्गी

### म्हाडाच्या लोकशाही दिनात नऊ अर्जांवर सुनावणी




**मुंबई :** म्हाडाच्या लोकशाही दिनाच्या निमित्ताने सर्वसामान्य नागरिकांना तक्रार निवारणासाठी व्यासपीठ मिळत असून, याद्वारे अर्जदार मिलिंद रेले यांचा ३५ वर्षांपासून रखडलेला सदनिका नियमितीकरणाचा प्रश्न मार्गी लागला.

म्हाडा वांद्रे पूर्वेतील करण्याचे आदेश दिले.

या सदनिकेत बेकायदा वास्तव्यास असलेल्यांना सूचना द्याव्यात, असे निर्देश दिले. गोपाल धुरी यांच्या अर्जप्रकरणी सुनावणीवेळी धुरी यांच्या सदनिकेचे २००० मध्ये सर्वेक्षण झाले असून, त्यांच्या पात्रतेबाबत निर्णय तात्काळ घेण्याचे निर्दे

# विधानसभेच्या जागावाटपात पितृपक्षामुळे आला अडसर

## महायुती, महाविकास आघाडीच्या उमेदवारांची घोषणा होणार नंतरच

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला ठरविण्यासाठी महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात बैठका सुरू झाल्या असल्या तरी अंतिम फॉर्म्युला लगेच जाहीर होणार नाही. पितृपक्ष संपल्यानंतर नवरात्र उत्सवाच्या काळात त्याची घोषणा होण्याची शक्यता आहे.

पितृपक्षाला १८ सप्टेंबरपासून सुरुवात होत आहे. २ ऑक्टोबरपर्यंत पितृपक्ष असेल. पितृपक्षात कोणताही शुभ निर्णय करू नये, अशी धारणा आहे. राजकीय पक्ष अनेकदा त्याचे पालन करतात, असे यापूर्वीही निदर्शनास आलेले होते. आमची एकमेकांशी चर्चा सुरू आहे, ती सुरूच राहील; पण पुढे पितृपक्ष आहे, त्यानंतरच जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर करू, असे दोन्ही बाजूंचे नेते सांगत आहेत. जागावाटपाची चर्चा मात्र पितृपक्षातही सुरू राहील. नवरात्र उत्सवाला ३ ऑक्टोबरपासून सुरुवात होत आहे. त्यानंतर जागावाटपाचे सूत्र, विविध पक्षांचे उमेदवार जाहीर करणे हे सगळे सुरू होईल.

**३० जागांचा पेच**

महाविकास आघाडीत १२५ जागांवर तिन्ही पक्षांचे एकमत झाले असल्याचे काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी आधीच जाहीर केले आहे. हे विधान लक्षात घेता अजून १६० हून अधिक जागांवर एकमत होणे बाकी असल्याचे स्पष्ट होते. त्यातील केवळ तीस एक जागा अशा आहेत की ज्यावर तोडगा काढणे कठीण आहे. या जागांवर मविआतील २ किंवा ३ पक्षांचा दावा असल्याने निर्णय घेणे अडचणीचे आहे.

नोव्हेंबरच्या १६ ते १८ तारखेदरम्यान विधानसभा निवडणुकीसाठीचे मतदान होईल, असे मानले जात आहे. त्यामुळे तीस दिवस आधी म्हणजे१६ ते १८ ऑक्टोबरदरम्यान निवडणूक आचारसंहिता लागू होण्याची दाट शक्यता आहे.जागावाटपाचा फॉर्म्युला ठरवून उमेदवार जाहीर करण्याची ही प्रक्रिया महायुती आणि महाविकास आघाडी १० ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करेल, अशी शक्यता आहे.महायुतीतील चर्चेत प्रगतीजागावाटपासंदर्भात भाजप, शिंदेसेना आणि अजित पवार गटात आतापर्यंत तीनवेळा चर्चा झाली आहे. तिन्हीवेळेस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. या शिवाय शिंदे-अजित पवार यांच्यातही स्वतंत्र चर्चा झाली आहे. फडणवीस-अजित पवार यांच्यातदेखील स्वतंत्रपणे चर्चा झालेली आहे.भाजपच्या एका ज्येष्ठ नेत्याने सांगितले, की २८८ पैकी ७५ टक्के जागांवर महायुतीत एकमत झाले आहे. याचा अर्थ जवळपास २१५ जागांवर एकमत झाल्याचे मानले जाते. मात्र, ७० हून अधिक जागा अशा आहेत की, ज्याबाबतचा तिढा अजूनही कायम आहे. खरी कसोटी या जागांच्या वाटपाचीच आहे.'सिटिंग गेटिंग' फॉर्म्युल्यानुसार ज्यांचे जिथे आमदार ती जागा त्यांना, हे लक्षात घेता २१५ जागांवर एकमत होणे अपेक्षितच आहे. कारण, तीन पक्षांचे मिळून संख्याबळ जवळपास तेवढेच आहे.

# अजित रानडे यांची गोखले इन्स्टिट्यूटच्या कुलगुरू पदावरून हकालपट्टी



**पुणे :** प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ.अजित रानडे यांची 'गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स' पुणेच्याकुलगुरू पदावरून हकालपट्टी करण्यात आली. अर्थतज्ज्ञ आणि राजकीय विश्लेषक डॉ. अजित रानडे यांना शनिवारी दुपारी गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सच्या कुलगुरूपदावरून हटवण्यात आले. अध्यापनाच्या अनुभवाशी संबंधित पात्रता निकषांची पूर्तता केली नसल्याचे कारण देत रानडे यांना दूर करण्यात आले आहे. गेल्या काही महिन्यांपासून डॉ. अजित रानडे यांच्या नियुक्तीवरून वाद सुरू होता. अडीच वर्षाच्या कार्यकाळानंतर रानडे यांची कुलगुरू पदावरुन हकालपट्टी करण्यात आली.

प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. अजित रानडे यांची शनिवारी पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सच्या (जीआयपीई) कुलगुरूपदावरून हकालपट्टी करण्यात आली. संस्थेच्या म्हणण्यानुसार रानडे यांची नियुक्ती विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांचे उल्लंघन करते. रानडे यांच्या नियुक्तीवर प्रश्न उपस्थित झाल्यानंतर गोखले इन्स्टिट्यूटने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन केली होती.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# राजकारण्यांना कुठे थांबायचे हे कळत नाही : जयंत पाटील

सांगली : बांधकाम व्यवसायात शिखर गाठूनही मोहन देशमुख यांनी कुठे थांबायचे हे ठरविले होते. त्याप्रमाणे ते थांबले. राजकारण्यांना कुठे थांबायचे हे कळत नाही. कारण या क्षेत्रात निवृत्ती नसते, असे मत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शनिवारी सांगलीत व्यक्त केले.

सांगलीचे मोहन देशमुख यांच्या 'कृष्णाकाठावरून सांगली ते मुंबई' या आत्मचरित्राचे प्रकाशन जयंत पाटील व ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांच्या हस्ते शनिवारी सांगलीच्या रोटरी सभागृहात पार पडले. यावेळी जयश्री देशमुख, सुरेश देशमुख, 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर, अरुण जोशी, पत्रकार अशोक घोरपडे उपस्थित होते.

जयंत पाटील म्हणाले की, भौतिक गोष्टींपासून माणूस दूर जात नसल्यामुळे समृद्ध जीवनाचा त्याला मार्ग सापडत नाही. या गोष्टीचे भान ठेवून देशमुख यांनी आयुष्य समृद्ध केले. बिल्डर असतानाही त्यांनी वाममार्गाने कामे करण्याची मानसिकता कधीही बाळगली नाही. त्यामुळेच राज्य सरकारने त्यांचे बरेच प्रस्ताव मंजूर केले. असा प्रामाणिकपणा सध्या दुर्मीळ आहे.

केतकर म्हणाले की, माणसांची आर्थिक, भौतिक समृद्धी वाढत असताना सामाजिक समृद्धी घटत चालली आहे. चाळींची जागा सोसायट्यांनी घेतल्यानंतर माणसांमधला दुरावा वाढत गेला. देशमुख यांनी आयुष्याची समृद्धी कशात आहे, हे ओळखले. त्यामुळे त्यांचे पुस्तक केवळ सांगलीचा कृष्णाकाठ किंवा मुंबईची कहाणी नाही, तर जीवनविषयक दृष्टिकोन स्पष्ट करणारा ऐवज आहे.

कॉंग्रेसची गादी घेऊन मुंबईला

मोहन देशमुख यांनी सांगितले की,



पदवीधर झालो त्यावेळी सांगलीत कॉंग्रेसचे अधिवेशन आयोजित केले होते. त्यासाठी हजारो गाद्या आणल्या होत्या. काही कारणांनी तो कार्यक्रम रद्द झाला आणि वसंतदादा कारखान्याच्या सभासदांना त्या गाद्यांचे वाटप झाले. माझे वडील सभासद असल्याने ती गादी मिळाली. कॉंग्रेसची ही गादी व ७५ रुपये घेऊन मी मुंबईत आलो आणि बांधकाम क्षेत्रात यश मिळविले. त्यांच्या या वाक्यावर हशा पिकला.

नंदू नाटेकरांच्या नावे अकॅडमी हवी

जागतिक स्तरावर बॅडमिंटनच्या माध्यमातून देशाचे नाव उंचावणारे नंदू नाटेकर सांगलीचे आहेत. मात्र, त्यांच्या नावे सांगलीत एखादी अकॅडमीही उभारली गेली नाही. भविष्यात तरी त्यांच्या नावे अकॅडमी उभी करावी, अशी सूचना केतकर यांनी केली.

## केंद्रीय रेल्वे व जलशक्ती राज्यमंत्री व्ही. सोमन्ना यांचा आज जिल्हा दौरा

**कोल्हापूर :** केंद्रीय रेल्वे व जलशक्ती राज्यमंत्री व्ही.सोमन्ना हे कोल्हापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे.

आज सोमवार,दिनांक १६ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता बेळगाव येथून वाहनाने कोल्हापुर येथे आगमन, दुपारी १.०० वाजता श्री करवीर निवासीनी अंबाबाई महालक्ष्मी मंदिराचे दर्शन, सोयीनुसार भाजप कार्यालय नागळा पार्क कोल्हापूर येथे भेट, दुपारी २.३० वाजता कोल्हापूर श्री छत्रपती शाहू महाराज टर्मिनसचे नूतनीकरणाची पाहणी, सायं. ४.०० वाजता कोल्हापूर श्री छत्रपती शाहू महाराज टर्मिनस येथून माननीय पंतप्रधान यांच्या ऑनलाईन द्वारा उपस्थितीत कोल्हापूर-पुणे मार्गावर वंदे भारत एक्सप्रेस हिरवा झेंडा दाखवून उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती, सायं. ४.४५ वाजता वाहनाने बेळगावकडे प्रयाण.



# आपटे वाचन मंदिराला नावीन्यपूर्ण उपक्रमांचा ध्यास

**कोल्हापूर :** पुस्तकांची देवघेव इतपत मर्यादित काम न करता साहित्य सेवेला पूरक ठरणारे उपक्रम अव्याहतपणे राबवणाऱ्या आणि ज्ञानवर्धनाचे व्रत स्वीकारलेल्या इचलकरंजी येथील 'आपटे वाचन मंदिरा'ने वाचनालयाच्या कामकाजाचे स्वरूपच बदलून टाकले आहे. समाजातील विविध घटकांना कवेत घेत वाचनालयाची कक्षा रुंदावली आहे. कालानुरूप अद्यायावत सुविधा निर्माण करण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे. यासाठी लाखमोलाच्या आर्थिक मदतीची निकड संस्थेला भासत आहे.

आपटे वाचन मंदिराने इचलकरंजीच्या साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावलेली आहे. वकील रामभाऊ आपटे यांनी स्वत:पुरते सुरू केलेले वाचनालय १८७० मध्ये 'नेटिव्ह जनरल लायब्ररी'मध्ये बदलल्यापासून ते आता शतकोत्तर सुवर्ण महोत्सव साजरा केलेल्या आपटे वाचन मंदिराने वाचकांची ज्ञानलालसा भागवण्याचे काम निरंतरपणे चालवले आहे.

दुर्मीळ ग्रंथांसह साहित्याचा मोठाच खजिना या ग्रंथालयाच्या संग्रही आहे. ५० वर्षांहून अधिक काळ चाललेली नामवंत वसंत व्याख्यानमाला, इंदिरा संत साहित्य पुरस्कार, मुले-महिलांसाठी उपक्रम, स्वतंत्र चित्र दालन, साहित्यिकांच्या वारसांनी विश्वासपूर्वक सुपूर्द केलेला वाङ्मयीन ऐवज असे भरीव उपक्रम चालवले जातात.

८३ हजारांवर पुस्तके असणाऱ्या या ग्रंथालयात नव्याने काही गोष्टी करण्याचे नियोजन आहे. पुस्तक मांडणी जुन्या पद्धतीच्या लोखंडी रॅकमध्ये केलेली आहे. ऐवजी काळाशी सुसंगत 'कॉम्पॅक्टर'ची रचना करण्याचे संचालक मंडळाने योजिले आहे. सुलभ पुस्तक हाताळणीची यंत्रणा राबवण्यासाठी ४० लाखांचा खर्च होणार आहे. बाल विभागात अद्यायावत फर्निचर, त्यांची सर्जनशीलता वाढवणारे उपक्रम यासाठी १५ लाखांचा खर्च होणार आहे. दुर्मीळ पुस्तकांचे अस्तित्व राहण्यासाठी डिजिटीकरण करणे तसेच स्थानिक लेखकांचे स्वतंत्र कक्ष यासाठी प्रत्येकी पाच लाख रुपये खर्च येणार आहे. वाचनालय हे शाळांमध्ये पोहोचावे यासाठी मोबाइल लायब्ररी सुरू करण्याकरिता १० लाखांचा खर्च अपेक्षित आहे.एकूणच ग्रंथालयांकडे येणारी वाचनाची संख्या कमी होत आहे. वेतनासह सर्व खर्च वाढत चालले आहेत. खर्चाच्या आवक- जावकचे गणित हाताबाहेर जात असताना शासकीय अर्थसाहाय्य मिळत नाही. अशा खडतर स्थितीत ज्ञानसेवेचे हे व्रत आणखी भक्कमपणे चालू राहण्यासाठी आपटे वाचन मंदिराच्या नियोजित उपक्रमांसाठी भरीव आर्थिक मदतीची गरज आहे. त्यातून साहित्यविषयक सेवा वाचकांपर्यंत अधिक सुलभपणे पोहचणे शक्य होणार आहे.

# आळवे गावात गेल्या शंभर वर्षांपासून साजरा होतो पर्यावरणपूरक गणेशोत्सव

**ठाणे :** पन्हाळा तालुक्यातील आळवे गावात चिखलमातीच्या गणेशमूर्ती बनवून गेल्या शंभर वर्षांपासून पर्यावरणपूरक गणेशोत्सव आजही साजरा करीत आहे. प्लास्टर ऑफ पॅरिस किंवा शाडूऐवजी चिखलमातीच्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना घरगुतीसह सार्वजनिक मंडळे करतात. गौरीगणपती विसर्जनावेळीचे निर्माल्य खड्ड्यात बुजवून त्याची विल्हेवाट लावली जाते; त्यामुळे खऱ्या अर्थाने पर्यावरणपूरक गौरीगणपती विसर्जन करण्याचा इतिहास आळवे गावाला आहे.

गावात भैरवनाथ देवालय असल्याने देवाला रंग आवडत नसल्याने, भक्तीतून आळवेत चिखलमातीचा गणेशोत्सव साजरा करतात. काही वर्षांपूर्वी मित्र, नातेवाईक 'चिखलाचा गणेशोत्सव साजरे करणारे गाव' म्हणून हिणवायचे. अलीकडे इको-फ्रेंडली गणेशोत्सव साजरा करण्यासाठी प्रबोधन सुरू असल्याने यापूर्वी गावाला हिणवणारे लोक आता कौतुक करत असल्याने गावकऱ्यांना त्याचा अभिमान आहे. ऋषीचे कूळ आणि नदीचे मूळ शोधू नये; त्यामुळे परंपरेचा ठाव घेण्यापेक्षा पूर्वापर चालत आलेल्या पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या परंपरेचा वसा गावकऱ्यांनी आज चालू ठेवला आहे.



**पर्यावरणपूरक गणेशोत्सव संकल्पना आळवे गावापुरती मर्यादित न राहता ती सामाजिक चळवळ बनली पाहिजे. प्रथमत: तिची सुरुवात घरातून झाली तर तिचे अनुकरण मंडळे करतील. सणाचे मूळ स्वरूप समजावून घेऊन त्याचा निसर्गावर वाईट परिणाम होणार नाही, याची दक्षता घेतली तरच उत्सव आणि सण आनंदाने साजरे होतील.**
**- संजय गावडे शिक्षक, आळवे, ता. पन्हाळा**

अठराशे लोकसंख्या असलेल्या गावात घरगुतीसह १३ सार्वजनिक मंडळांच्या गणेशमूर्ती तीन-चार फुटांपर्यंत चिखलमातीपासून बनविलेल्या असतात. गणेशचतुर्थीच्या आधी चारच दिवस गणेशमूर्ती बनविल्या जातात. वर्गणीसाठी हट्ट नाही, डॉल्बीचा दणदणाट नाही की मूर्तीची ईर्ष्या नाही. पारंपरिक पद्धतीच्या सवाद्य गणेशमूर्तीचे आगमन आणि विसर्जन केले जाते. गणेशोत्सवातील एकीच्या बळामुळे गावातील मंडळात ईर्ष्या नसल्याने राजकीय वैरत्व कमी; शिवाय गुन्हेगारी प्रकार कमी असल्याने गावातील लोक गुण्यागोविंदाने राहतात. पर्यावरणपूरक गणशोत्सव आळवे गावापुरता मर्यादित न राहता तालुक्यातील गावागावांत साजरा होण्याची आळवेकरांची अपेक्षा आहे.

# विधानसभा आचारसंहिता कधीही लागू द्या, सांगली जिल्हा प्रशासन निवडणुकीसाठी सज्ज

**सांगली :** जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघांसाठी सहा हजार ३३० मतदान यंत्रे लागणार आहेत. ती सर्व मतदारसंघाच्या ठिकाणी पोहोच केली आहेत. शासकीय गोदामामध्ये सुरक्षित यंत्रे ठेवली आहेत. तसेच जिल्ह्यातील २४ लाख ५४ हजार ३७७ मतदारांसाठी दोन हजार ४८२ मतदान केंद्रेही केली आहेत. विधानसभा आचारसंहिता कधीही लागू झाली तरी प्रशासनाने मतदार यादी अंतिम करण्यासह निवडणुकीसाठीची सर्व यंत्रणा सज्ज ठेवली आहे.

राज्य सरकारचा कार्यकाल ३० नोव्हेंबर २०२४ रोजी संपणार आहे. त्यापूर्वी नवीन आमदार निवडून जाणे गरजेचे आहे.

**अशी आहेत मतदान केंद्रे**
**विधानसभा मतदारसंघ - मतदान केंद्रांची संख्या**
**मिरज - ३०७**
**सांगली - ३१५**
**इस्लामपूर - २९०**
**शिराळा - ३३४**
**पलूस-कडेगाव - २८५**
**खानापूर - ३५६**
**तासगाव-क.महांकाळ - ३०८**
**जत - २८७**

म्हणून राज्यात १५ ऑक्टोबरपूर्वी केव्हाही विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू शकते. म्हणून जिल्हा प्रशासनाने निवडणुकीची तयारी पूर्ण केली आहे. जिल्ह्यातील जत, इस्लामपूर, खानापूर, तासगाव-कवठेमहांकाळ, सांगली, मिरज, पलूस-कडेगाव, शिराळा या विधानसभा मतदारसंघांसाठी लागणारी मतदान यंत्रे मतदारसंघात तपासून पाठविली आहेत. आचारसंहिता जाहीर होताच अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती प्रशिक्षण सुरू होणार आहे.

विधानसभा निवडणुकीची मतदार यादी अंतिम केली असून त्यानुसार मतदानाची केंद्रेही निश्चित केली आहेत. मतदान यंत्रांची तपासणी पूर्ण करून आठही विधानसभा मतदारसंघांत पाठविली आहेत. मतदानाच्या दृष्टीने आमची तयारी पूर्ण झाली आहे, असे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# घरांवर आढळले टेहाळणी करणारे ड्रोन

## ग्रामीण भागात भीतीचे वातावरण, पोलिसांनी मागवली माहिती

**कोल्हापूर :** जिल्ह्यात टोप, दानोळी, नरंदे, शिरोली, पडळसह काही ग्रामीण भागात रात्रीच्या वेळी ड्रोनच्या घिरट्या सुरू आहेत. अचानक सुरू असलेल्या या ड्रोनच्या घिरट्यांमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी पोलिसांनी प्रभारी अधिकाऱ्यांकडून माहिती मागवली आहे. सरकारी काम, खासगी ड्रोन की चोरट्यांच्या शोधासाठी कोणी ड्रोन उडवत आहेत का? याची माहिती घेतली जात आहे. येत्या दोन दिवसात या प्रकाराची माहिती घेतली जाणार असल्याचे पोलिस प्रशासनाने सांगितले.

जिल्ह्यात सध्या रात्रीच्या अंधारात भिरभिरणाऱ्या ड्रोनमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. चोरी होत असल्याच्या अफवा असल्याने काही गावांत तरुणांनी गस्तही सुरू केली आहे. चोरट्यांचा माग काढण्यासाठी, सरकारी कामासाठी काही ठिकाणी माहिती घेतली जात आहे का, काही ठिकाणी खासगी ड्रोन उडवले जात आहेत का? याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे. सर्वसामान्यांच्या तसेच सार्वजनिक सुरक्षेला हानी पोहोचवू शकणारी ड्रोन सर्वत्र भिरभिरताना दिसत आहेत. ड्रोन उडविण्यासाठी जिल्हाधिकारी, पोलिस आणि महापालिकेचा परवाना सक्तीचा आहे.



ड्रोन वापरण्यासाठी प्रशिक्षण अत्यावश्यक असून, पुणे आणि दिल्ली येथे ते तंत्रशुद्धपणे दिले जाते. ड्रोनचे वजन, त्यामुळे होणारे अपघात, रहिवासी इमारतींवर उडविण्यासाठी आवश्यक उंची याविषयी अनेक नियम पाळावे लागतात. ड्रोनचा वापर थेट राष्ट्रीय सुरक्षेशी निगडित आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने संवेदनशील भागात ड्रोन उडविण्यावर निर्बंध आहेत. पोलिस, प्रशासनाची कार्यालये, विमानतळ, महत्त्वाची रुग्णालये, प्रयोगशाळा, संरक्षणविषयक संस्था, समुद्रकिनारे आदी ठिकाणी ड्रोन उडवता येत नाही. ते उडविण्यासाठी प्रशिक्षित, प्रमाणपत्रधारक कर्मचारी आवश्यक आहे.

### घरातील सोने चाचपणीसाठी ?

**रात्रीच्या वेळी घरावर फिरणाऱ्या ड्रोनच्या माध्यमातून घरात सोने किती आहे, याची चाचपणी केली जात आहे, अशी अफवाही रहिवाशांच्यात आहे. ड्रोनच्या माध्यमातून रेकी करून चोरी केली जात असल्याचा संशयही रहिवाशांकडून व्यक्त केला जात आहे. या प्रकाराने काहीजण संध्याकाळी सात वाजताच घरातील दिवे बंद करून झोपत असल्याची ग्रामीण भागात स्थिती आहे. रात्री उडवल्या जाणाऱ्या ड्रोनची माहिती घेण्याचे काम सुरू आहे. प्रभारी अधिकाऱ्यांकडून माहिती मिळाल्यानंतर संबंधितांवर कारवाई होईल. ड्रोन आकाशात दिसल्यास तातडीने जवळच्या पोलिस ठाण्याशी संपर्क साधा. -रवींद्र कळमकर, पोलिस निरीक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा**

# इस्लामपूर मतदारसंघात मनीपॉवरचे राजकारण पेटणार

## जयंत पाटील यांच्या स्टार प्रचारक समर्थकांपुढे आव्हान



इस्लामपूर : नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष व आमदार जयंत पाटील यांच्या इस्लामपूर मतदार संघात मनीपॉवरच्या राजकारणाची चर्चा आहे. हातकणंगले लोकसभा निवडणुकीतही मनीपॉवरचा वापर झाला होता. आगामी विधानसभेल ाजयंत पाटील यांच्या विरोधात मनीपॉवरची ताकद वापरण्याचा डाव विरोधाकांकडून आखला जात आहे. त्यामुळेच पाटील यांच्या स्टार प्रचारक समर्थकांपुढे मोठे आव्हान राहणार आहे.

गेल्या सात विधानसभा निवडणुकांमध्ये जयंत पाटील यांच्या मताधिक्याच्या आकडेवारीचा आलेख पाहता विरोधी महायुतीकडून रणनीती आखली जात आहे. सध्या भाजप आणि शिंदेसेनेमधील दिग्गज नेते एकवटले आहेत. लोकसभेप्रमाणेच मनीपॉवरचा फंडा आगामी विधानसभेला वापरण्याचा डाव जयंत पाटील यांच्या विरोधकांकडून सुरू आहे. त्यामुळे जयंत पाटील समर्थकांना आत्तापासूनच सावध भूमिका घ्यावी लागणार आहे.

प्रतीक पाटील यांच्यापुढे विरोधकांचे आव्हान

दोन महिन्यांवर आलेल्या विधानसभेसाठी जयंत पाटील समर्थकांत सध्यातरी हालचाली नाहीत. परंतु, स्वतः जयंत पाटील बुथ कमिट्या सक्षम करण्यात व्यस्त आहेत. त्यांच्या अपरोक्ष मतदारसंघाची जबाबदारी चिरंजीव प्रतीक पाटील सांभाळत आहेत. राजारामबापू पाटील उद्योग समुहात युवकांना संधी देण्याचे प्रयत्न झाले. सध्या पाटील यांनी शरद पवार यांचे नेतृत्व बळकट करण्यासाठी राज्यात संपर्क वाढवला आहे.

त्यामुळेच इस्लामपूर मतदारसंघात प्रतीक पाटील तळ ठोकून आहेत. याउलट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी जयंत पाटील यांना मतदारसंघात गुंतवून ठेवण्यासाठी महायुतीतून उमेदवाराची चाचपणी सुरू केली आहे.

राज्यात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची ताकद वाढत आहे. इस्लामपूर मतदारसंघातील आमचे नेते आमदार जयंत पाटील यांची ताकद अबाधित आहे. विधानसभेला त्यांच्या अपरोक्ष त्यांचे समर्थक एकदिलाने प्रचार यंत्रणा राबवतील. जिल्ह्यातही राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या आमदारांची संख्या वाढवण्यासाठी आमचे प्रयत्न राहतील.

# सांगली जिल्ह्यातील दहा हजार रिक्षा-टॅक्सी चालकांना होणार लाभ

**सांगली :** राज्यात अखेर 'धर्मवीर आनंद दिघेसाहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळ' स्थापन झाले आहे. त्यामुळे रिक्षा-टॅक्सी चालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. जिल्ह्यातील ८ हजार रिक्षा चालक व २८०० टॅक्सी चालक यांना याचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

रिक्षा व टॅक्सी चालकांचे स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याची अनेक वर्षांपासून मागणी सुरू होती. त्यासाठी वेगवेगळी आंदोलने सुरू होती. अखेर शासनाने १६ मार्च २०२४ रोजी कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार 'धर्मवीर आनंद दिघेसाहेब' नावाने मंडळ स्थापन करण्यात आले आहे. कल्याणकारी मंडळाचा सभासद होण्यासाठी रिक्षा व टॅक्सी चालकांकडे परवाना व बॅज असणे आवश्यक आहे. जिल्ह्यात आरटीओ कार्यालयाकडे ८ हजार १९२ रिक्षांची नोंद आहे. तसेच टॅक्सींची संख्या २८१० आहे. त्यामुळे जवळपास दहा हजारहून अधिक जणांना मंडळाच्या योजनेचा लाभ मिळू शकतो.

कल्याणकारी मंडळाकडे वार्षिक वर्गणी, शासकीय अनुदान, नोंदणी शुल्क आणि इतर मार्गाने निधी संकलित होईल. योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हा कार्यालयात अर्ज करावा लागेल.

**नोंदणी करणे आवश्यक**

ऑटो रिक्षा परवाना धारक, टॅक्सी चालक यांची नोंदणी आरटीओ कार्यालयामार्फत केली जाईल. नोंदणी केलेल्यांना ओळखपत्र दिले जाईल. मंडळाचा सभासद होण्यासाठी ऑटो रिक्षा, मीटर टॅक्सी परवाना, बॅज असणे बंधनकारक राहील. पात्र अर्जदाराच्या कुटुंबातील चार सदस्यांना मंडळाच्या योजनांचा लाभ मिळेल.पाचशे रुपये नोंदणी शुल्कयोजनेचा लाभ घेण्यासाठी सभासद नोंदणी आणि ओळखपत्र शुल्क पाचशे रूपये असेल. त्यानंतर वार्षिक सभासद शुल्क तीनशे रूपये राहणार आहे.

# कोल्हापुरातील उद्योजकाला ८१ लाखांचा गंडा

**कोल्हापूर :** ऑनलाईन फसवणुकीचे रोज नवे प्रकार समोर येत असताना आता एनआयएचे (राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणा) अधिकारी असल्याचे सांगत ऑनलाईन अटक करून उद्योजकाची ८१ लाखांची लूट केली. दहशतवादी समुहाला आर्थिक मदत केल्याची भीती घालत अज्ञातांनी ही लुबाडणूक केली. हा प्रकार ६ ते ११ सप्टेंबर दरम्यान घडला. याबाबत उद्योजकाने शुक्रवारी (दि. १३) राजारामपुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. फसवणूक झालेले उद्योजक गोशिमाचे माजी अध्यक्ष आहेत.

राजारामपुरी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील उद्योजकास ६ सप्टेंबरला व्हॉट्सप कॉल आला. एनआयएचे अधिकारी असल्याचे सांगत त्याने न्यायालयाच्या आदेशानुसार एका गंभीर गुन्ह्यात तुम्हाला ऑनलाईन अटक केल्याचे सांगितले. 'हैदराबाद येथील एका व्यक्तीने दहशतवादी समुहाला १२२ कोटी रुपयांची मदत केली आहे. या पैशांमधून दहशतवाद्यांनी शस्त्रे खरेदी केली आहेत. या व्यवहारात




तुमच्या बँक खात्यात २० ते २२ कोटी रुपये वर्ग झाले आहेत.

हा देशविरोधी गंभीर गुन्हा असल्याने एनआयएचे अधिकारी तुमच्या अवतीभवती वावरत आहेत. तुमच्यावर करडी नजर असून, कोणत्याही क्षणी ते तुम्हाला संपवू शकतात. तुमच्या जिवाला धोका असल्याने जवळच्या एका हॉटेलमध्ये जाऊन आमच्या ऑनलाईन अटकेत राहा,' असे सांगून त्याने उद्योजकास भीती घातली. जबरदस्तीने शिवाजी पार्क येथील एका हॉटेलमध्ये राहण्यास भाग पाडले. त्यानंतर यातून सुटका करून घेण्यासाठी बँक खात्यावर ८१ लाख रुपये आरटीजीएसद्वारे वर्ग करून घेतले.

भीतीपोटी उद्योजकाने त्यांच्या बँक खात्यातील ८१ लाख रुपये संशयिताच्या बँक खात्यात वर्ग केले. त्यानंतर संशयितांचे फोन यायचे थांबल्याने त्यांना फसवणूक झाल्याचे लक्षात आले. याबाबत त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार राजारामपुरी पोलिसांनी अज्ञातावर गुन्हा दाखल करून संशयितांचा शोध सुरू केला आहे.

संबंधित उद्योजकाने हैदराबाद येथील व्यक्तीशी कोणताही आर्थिक व्यवहार केलेला नाही. मात्र, थेट जिवे मारण्याची भीती घातल्याने ते संशयिताच्या सूचनांचे पालन करीत गेले. याच भीतीतून त्यांनी हॉटेलमध्ये स्वत:ला डांबून घेतले. आधार कार्ड, पॅन नंबर यासह इतरही महत्त्वाची माहिती संशयितांकडे असल्याने ते अधिकच घाबरले.

# विशाल पाटलांच्या जयंत पाटीलांना कोपरखळ्या

**तासगाव :** राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते रोहित पाटील व त्यांच्या सर्व कार्यकर्त्यांनी महाविकास आघाडीचे आदेश असतानाही लोकसभा निवडणुकीत मला मोठी मदत केली. त्यामुळे या विधानसभा निवडणुकीत तुमच्या पक्षाचा आमदार निवडणूक आणायचा आहे, अशी कोपरखळी खासदारविशाल पाटीलयांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्षजयंत पाटीलयांना नाव न घेता मारली. याचवेळी रोहित पाटील यांना आमदार करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

सावळज येथे शुक्रवारी पंचायत समितीचे माजी सभापती चंद्रकांत पाटील यांच्या अर्धपुतळा अनावरणप्रसंगीविशाल पाटीलबोलत होते. सावर्डे येथील कार्यक्रमात विशाल पाटील यांनी ज्येष्ठ नेते अजितराव घोरपडे यांना समर्थन दिले होते. मात्र, आजच्या सावळज येथील कार्यक्रमात तासगाव-कवठेमहांकाळ विधानसभा निवडणुकीबाबत खासदार पाटील यांनी रोहित यांना समर्थक देत भूमिका स्पष्ट केली. त्यामुळे खासदारांच्या या मतदारसंघातील भूमिकेबाबतच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे.

ते म्हणाले, आर. आर. आबांच्या पश्चात ही जबाबदारी रोहित पाटील यांच्यावर पडली. त्यांनी केलेली मदत तुम्ही अध्यक्ष असल्यामुळे उघडपणे सांगता येत नाही. कारण तुमचे आदेश होते, महाविकास आघाडीचे काम केले पाहिजे. मात्र रोहित पाटील यांनी राज्यभर काटेकोरपणे महाविकास आघाडीच्या उमेदवारांसाठी काम केले. त्या व्यापात तुम्ही त्यांना गुंतविल्यामुळे त्यांना या ठिकाणी येता आले नाही. पण समर्थकांनी एक चांगला निर्णय घेतला आणि मला एक संधी दिली, असा टोला यावेळी खासदार पाटील यांनी आमदारजयंत पाटील यांना लगावला.

# पोर्ट ब्लेअरला तुम्ही किती ओळखता? जाणून घ्या, शहराच्या नावाचा इतिहास

हिंद महासागरातील उत्तर पूर्व भागात अंदमान निकोबार बेटे आहेत. या बेटांबाबत तुम्ही पुस्तकात वाचलच असेल. याच बेटांच्या समूहाची राजधानी म्हणजे पोर्ट ब्लेअर. केंद्र सरकारने नुकतेच पोर्ट ब्लेअरचेनाव बदलले आहे. आता पोर्ट ब्लेअर नाव इतिहासजमा झाले असून या शहराला 'श्री विजयपुरम' या नव्या नावाने ओळखले जाणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी एक्सवर पोस्ट लिहीत सरकारच्या या निर्णयाची माहिती दिली. केंद्र सरकारच्या या निर्णयाने पोर्ट ब्लेअर आणि अंदमान निकोबार बेटांचा मुद्दा देशभरात चर्चेत आला आहे. याच निमित्ताने आपण पोर्ट ब्लेअर कशासाठी प्रसिद्ध आहे? या बेटाचा इतिहास नेमका कसा आहे? याची माहिती घेऊ या..

का फेमस आहे पोर्ट ब्लेअर?

तसं पाहिलं तर देशाला स्वातंत्र्य मिळण्याच्या आधीपासून पोर्ट ब्लेअर प्रसिद्ध आहे. तुम्ही सेल्युलर जेलचं नाव ऐकलं असेलच. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात सर्वात कुख्यात जेल म्हणजे सेल्युलर जेल. काळ्या पाण्याची शिक्षा म्हटलं की सेल्युलर जेल असं समीकरण त्याकाळी रूढ झालं होतं. सेल्युलर जेल पोर्ट ब्लेअर शहरातील अटलांटा पॉइंटवर स्थित आहे. तीन मजल्यांचे हे जेल आहे. १९०६ मध्ये इंग्रजांनी या जेलचे बांधकाम केले होते. भारताच्या स्वातंत्र्यसैनिकांना येथे कैदेत टाकले जात होते. बटूकेश्वर दत्त, बाबाराव सावरकर, विनायक दामोदर सावरकर, दिवान सिंह यांना याच तुरुंगात बंद करण्यात आले होते.

शहराला पोर्ट ब्लेअर नाव कसं पडलं?

या शहराला पोर्ट ब्लेअर नाव कसं पडलं यामागे थोडा इतिहास आहे. लेफ्टनंट आर्चीबाल्ड ब्लेअरच्या नावावरून या शहराला पोर्ट ब्लेअर नाव देण्यात आले. ब्लेअर ईस्ट इंडिया कंपनीत नौदल अधिकारी होते. सन १७८९ मध्ये त्यांनी या परिसराचा सर्वे केला होता. येथे एक आरा गिरणी आहे. आशिया खंडातील ही सर्वात जुनी आणि सर्वात मोठी आरा गिरणी असल्याचे मानले जाते. सन १८८३ मध्ये या गिरणीची सुरुवात करण्यात आली होती.

जपानी सैन्याने केला होता कब्जा

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात १९४२ मध्ये जपानी सैन्याने पोर्ट ब्लेअर ताब्यात घेतले होते. सेल्युलर जेल मधील कैद्यांना या सैन्याने सोडून दिले होते. परंतु नंतर या सैन्याने कैद्यांच्या कुटुंबीयांना त्रास देण्यास सुरुवात केली. त्यांना तुरुंगात टाकण्यात आले. याच कारणामुळे जपानी सैनिकांना ब्रिटिश सैनिकांपेक्षा जास्त क्रूर मानले जात होते. २९ डिसेंबर १९४३ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस अंदमानला गेले होते. येथे जपानी सैन्याच्या अडमिरल इशिकावा यांनी त्यांचे स्वागत केले होते. यानंतर दुसऱ्या दिवशी नेताजी पोर्ट ब्लेअरला गेले होते. येथे पहिल्यांदा भारतीय ध्वज फडकवण्यात आला. त्यांनीं या जेलचा दौरा सुद्धा केला होता. ज्या ठिकाणी भारतीय कैद्यांना ठेवले होते तेथे त्यांना नेले नाही.



# पुण्याच्या पहिल्या वंदे भारतचे आज लोकार्पण

## पुणे, सातारा, सांगली आणि कोल्हापूर प्रवास होणार सोयीस्कर

**पुणे :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्याला मिळालेल्या पहिल्या वंदे-भारत एक्स्प्रेसचे लोकार्पण सोमवारी (दि.१६) होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हर्च्युअल पद्धतीने हे उद्घाटन होणार आहे. यावेळी पुणे-हुबळी या वंदे-भारत एक्स्प्रेसला केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ हे पुणे स्थानकावरुन झेंडा दाखवणार आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून पुणेकरांना प्रतिक्षित असणारी तसेच पुण्याहून सुटणाऱ्या पहिल्या वंदे भारत एक्स्प्रेसमुळे सातारा, मिरज, सांगली आणि कोल्हापूरमधील रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने मोदी सरकारकडून महाराष्ट्राला ३ नव्या वंदे भारत एक्स्प्रेस मिळाल्या आहेत. यामध्ये पुणे-हुबळी, नागपूर-सिकंदराबाद आणि कोल्हापूर-पुणे आदी मार्गाचा समावेश आहे. या तिन्ही वंदे भारतचे लोकार्पण पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते होणार आहे. पहिल्या वंदे भारत एक्स्प्रेसबद्दल माहिती देताना मोहोळ म्हणाले, ङ्गपुण्याला पहिली वंदे भारत एक्स्प्रेस मिळाली, ही पुणेकर प्रवाशांसाठी निश्चितच आनंदाची बाब आहे.

# मुंबई-पुणे प्रवास अधिक वेगवान

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) हाती घेतलेल्या ठाणे खाडी पूल-३ प्रकल्पातील दक्षिणेकडील अर्थात मुंबईहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेचे काम पूर्ण झाले आहे. आता विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जारी होण्यापूर्वी ही मार्गिका वाहतूक सेवेत दाखल करण्याचा निर्णय एमएसआरडीसीने घेतला आहे.

सप्टेंबरअखेरीस वा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात ही मार्गिका वाहतुकीसाठी खुली होणार आहे. ही मार्गिका वाहतुकीस खुली झाल्यास मुंबईहून पुण्याकडे जाण्यासाठी खाडीपूल-२ सह नवीन ठाणे खाडी पूल-३ चा पर्याय उपलब्ध होणार आहे. त्यामुळे मुंबई - पुणे प्रवास वाहतूक कोंडीमुक्त, वेगवान होणार आहे. मुंबई - पुणे प्रवासासाठी सध्या दोन खाडीपूल सेवेत आहेत. या पार्श्वभूमीवर एमएसआरडीसीने ठाणे खाडी पूल-३ प्रकल्प हाती घेतला आहे. हा प्रकल्प आतापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र तांत्रिक अडचणींमुळे प्रकल्प लांबणीवर पडला आहे. आता मात्र या प्रकल्पाने वेग घेतला आहे. या प्रकल्पातील दक्षिणेकडील मार्गिकेचे अर्थात मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या मार्गिकेचे काम पूर्ण झाल्याची माहिती एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक

# मला ज्ञान देण्यापेक्षा मान्य करा की तुम्ही घर फोडलं, भाग्यश्री अत्रामांचं अजितदादांना उत्तर

विधानसभा निवडणुका जवळ आलेल्या असताना फोडाफोडीच्या राजकारणाला सुरुवात झाली आहे. या राजकारणाचा अंक राजकीय मंडळींच्या घरांतच सुरू झाला आहे. अजित पवार गटाचे नेते आणि मंत्री धर्मरावबाब अत्राम यांची मुलगी भाग्यश्री अत्राम (इहरसूरीहीशश -ीीरा) यांनी नुकताच शरद पवार गटात प्रवेश केला आहे. भाग्यश्री अत्राम वडिलांविरोधात निवडणूक लढवू शकतात अशी शक्यता आहे. या घडामोडी घडत असताना धर्मरावबाबा अत्राम यांनी मुलीवर जोरदार टीका केली होती. तसेच जनसन्मान यात्रेच्या निमित्ताने गडचिरोलीत आलेल्या अजित पवार यांनीही भाग्यश्री अत्राम यांना चार शब्द सुनावले होते. यानंतर आता भाग्यश्री अत्राम यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. तुम्ही शरद पवारांना सोडून गेलात तेव्हा घर फुटत असल्याचं तुम्हाला कळलं नाही का? असा सवाल भाग्यश्री अत्राम यांनी केला.

**काय म्हणाले होते अजित पवार ?**

अजित पवार जनसन्मान यात्रेच्या निमित्ताने गडचिरोलीत आले होते. यावेळी त्यांनी भाग्यश्री अत्राम यांना उद्देशून सांगितले होते की तुम्ही तुमच्या वडिलांना पाठिंबा दिला पाहिजे. निवडणुकीत जिंकण्यासाठी त्यांना मदत केली पाहिजे. त्यांच्याकडेच या प्रदेशाचा विकास करण्याची क्षमता आहे. दृष्टीकोनही आहे. लक्षात ठेवा, वस्ताद नेहमी एक डाव स्वतःकडे राखून ठेवत असतो. कुटुंबातील फूट समाज कधीही स्वीकारत नाही. ही गोष्ट मी सुद्धा अनुभवली आहे. मी माझी चूक मान्य केली आहे.

**त्यावेळी अजितदादांच्या लक्षात आलं नाही का?**

भाग्यश्री अत्राम म्हणाल्या, अजित पवार आता गडचिरोलीत येऊन मला ज्ञान शिकवत आहेत. पण तुम्ही ज्यावेळी शरद पवारांना सोडून गेलात त्यावेळी घर फुटत आहे हे तुम्हाला कळलं नाही का? आज तुम्ही मला कोणत्या तोंडाने सांगत आहात की घर सोडू नका असा सवाल भाग्यश्री अत्राम यांनी केला. आधी तुम्ही मान्य करा की तुम्ही घर फोडलं आहे. मी काही घर फोडलेलं नाही. ज्यावेळी धर्मरावबाबा अत्राम यांचे नक्षलवाद्यांनी अपहरण केले होते. त्यावेळी शरद पवार यांनीच मध्यस्थी करत त्यांची सुटका केली होती. त्यामुळे शरद पवारांचे आमच्या कुटुंबावर उपकार आहेत. त्या उपकारांतून उतराई होण्याचाच प्रयत्न मी करत आहे, असे भाग्यश्री अत्राम म्हणाल्या.

**धर्मराव अत्राम काय म्हणाले होते ?**

अहेरी येथील यात्रेला संबोधित करताना राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी शरद पवार गटावर जोरदार हल्लाबोल केला होता. विरोधक मुलीला हाताशी धरून घर फोडण्याचे काम करत आहेत. जी मुलगी तिच्या वडिलांची झाली नाही ती तुमच्या पक्षाची कशी होणार असा सवाल अत्राम यांनी केला होता. माझी खुर्ची घेण्याचा जे प्रयत्न करतील त्यांना मी बाजूला करणार आहे. मी काम करणारा माणूस आहे. सातत्याने कामच करत आलो आहे. पण आता हे मध्येच येऊन असं काही करणार असतील तर त्यांनी वाटी लावण्याचे काम आपल्याला करायचे आहे.

# नेवरीत तीन पानी जुगार अड्ड्यावर छापा

## ११ लाख १४ हजाराचा मुद्देमाल जप्त : सहाजणांवर गुन्हा दाखल

**विटा :** नेवरी (ता. कडेगांव) हद्दीत तीन पानी जुगार खेळणाऱ्या सहा तरूणांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यांच्याकडील जुगारातील रोख ५४ हजार रुपये व १० लाख ६० हजार रुपये किंमतीच्या पाच दुचाकी, एक चारचाकी जप्त केल्याचे विटा उपविभागीय पोलिस अधिकारी विपुल पाटील यांनी सांगितले.



अक्षय सुनिल धुमाळ (वय २२), प्रशांत संजय घोरपडे (वय २६), साईराज नंदकुमार बोडरे (वय ३४), अमित महेश भिंगारदेवे (वय २४), बिरजु दिनेश पंडीत (वय २९, सर्व रा. विटा) व नाथा सुदाम गुरव (वय ४०, कडेगांव) अशी ताब्यात घेण्यात आलेल्या तरूणांची नांवे आहेत. याबाबत पोलिस श्रीकांत दत्तात्रय कुंभार (विटा) यांनी कडेगांव पोलिसांत फिर्याद दिली. ही कारवाई (ता. १३) दुपारी साडेचारच्या सुमारास करण्यात आली.

# पुणे - बंगळुरू महामार्ग होणार चौदा पदरी; नितीन गडकरी यांची घोषणा

**पुणे :** मुंबई-पुणेद्रुतगतीमहामार्गामुळेपुढील पन्नास वर्षे वाहतुकीला काही अडचण निर्माण होणार नाही असे आपण म्हणायचो, मात्र अद्यापही वाहतुक कोंडीचा प्रश्न सुटलेला नाही. त्यामुळे अटल सेतूवरून बाहेर पडताचमुंबईते बंगळुरू चौदा पदरी द्रुतगतीमहामार्गतयार केला जाणार असून कामाचे कंत्राटही निघाले आहे. हा महामार्ग पुण्याच्या रिंगरोडला जोडला जाणार असून पुढील सहा महिन्यांत कामाला सुरूवात होईल अशी घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली. त्यामुळे पुणे- मुंबई प्रवास आणखी वेगवान होणार आहे.



सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आणि सीओईपी माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने अभियंता दिनी आयोजित 'सीओईपी अभिमान पुरस्कार' प्रदान सोहळ्यात गडकरी बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरू प्रा. सुनिल भिरूड, नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष भरत गीते, मानद सचिव डॉ. सुजीत परदेशी उपस्थित होते. यंदाचा सीओईपी जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ उद्योगपती पी.एन. भगवती यांच्या वतीने लोहिया यांनी स्विकारला. तसेच अभिनेता वैभव तत्ववादी, राज्याच्या पर्यावरण विभागाचे मुख्य सचिव प्रविण दराडे, सिक्कीमचे कॅबिनेट मंत्री राजू बसनेत, 'जे.पी मॉर्गन चेस' च्या सीईओ मोनिका पानपालिया आणि टेस्ला मोटर्सचे वरिष्ठ संचालक ऋषिकेश सगर यांना सीओईपी अभिमान पुरस्काराने गौरविण्यात आले.

गडकरी म्हणाले, समाजाच्या गरजांवर आधारित संशोधन करणे आणि त्यातून निर्माण होणारी सेवा, वस्तू, उत्पादन सर्वसामान्यांना परवडणारे असले पाहिजे. रोजगाराची निर्मिती करणारे आणि निर्यात वाढविणारे तंत्रज्ञान प्रत्येक क्षेत्रात आपल्याला अवलंबावे लागणार आहे.स्मार्ट सिटी नव्हे तर स्मार्ट व्हिलेज गरजेचेकृषी अर्थव्यवस्थेकडे दूर्लक्ष केल्यामुळे शहरातील लोकसंख्येत भर पडत आहे. स्मार्ट सिटी नाही तर स्मार्ट व्हिलेज झाले पाहिजेत. त्यासाठी कृषी क्षेत्राला पाणी, जंगल, जमीन आणि प्राणी यावर आधारित नवीन तंत्रज्ञानांची जोड द्यावी लागेल. देशातील ६५ टक्के लोकसंख्या कृषि अर्थव्यवस्थेवर आधारित आहे. गाव, गरीब, मजूर आणि शेतकरी हा समृद्ध होत नाही तो पर्यंत आपल्याला आत्मनिर्भर भारत म्हणता येणार नाही. शेतकरी हा आता केवळ अन्नादाता राहिलेला नसून तो उर्जादाता झाला आहे. ग्रामीण भागात रोजगार निर्मिती झाली तर कशाला लोक शहरात येतील ? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.मी असेपर्यंत विनावाहक कार देशात येणार नाहीसमाजाचा विकास आणि गरिबांचे जीवन बदलणारे तंत्रज्ञान पाहिजे. मी जो पर्यंत आहे तोवर विनावाहक कार देशात येणार नाही. हे संशोधन चांगले आहे की वाईट यावरून मला काही देणे घेणे नाही.

# राजीनामा देण्याबाबत भाष्य म्हणजे उशीरा सुचलेले शहाणपण

## आण्णा हजारेंचा केजरीवालांवर हल्लाबोल



**मुंबई :** केजरीवालांचे राजीनामा देण्याबाबतच भाष्य म्हणजे उशिराने सुचलेले शहाणपण असल्याचे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी म्हटले आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांना सुप्रीम कोर्टाकडून जामीन मंजूर झाला आहे. जामीन मंजूर झाल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार असल्याचे जाहीर केलंय. मात्र यावर प्रतिक्रिया देताना अण्णा हजारे यांनी आपण केजरीवाल यांना सुरुवातीपासून समाजसेवा करा आपण खूप पुढे जाल असा सल्ला दिला होता. मात्र त्यांनी तो ऐकला नाही आणि शेवटी त्यांना या परिस्थितीला सामोरे जावं लागलं. आता त्यांना याची जाणीव झाल्याचं हजारे म्हणाले आहेत.

दोन दिवसांत राजीनामा देणार, केजरीवाल यांची मोठी घोषणा

अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मिळाल्यानंतर त्यांनी आज (दि.१५) दिल्लीत कार्यकर्त्यांसी संवाद साधला. कार्यकर्त्यांशी बोलत असताना केजरीवांनी येत्या दोन दिवसात नायब राज्यपालांकडे राजीनामा सूपुर्द करणार असल्याची घोषणा केली.

अरविंद केजरीवाल काय काय म्हणाले होते?

सीता जेव्हा वनवासातून परतली तेव्हा तिला अग्नीपरीक्षा द्यावी लागली होती. मी आज अग्नीपरीक्षा देतोय. दिल्लीत फ `ब्रुवारी महिन्यात विधानसभा निवडणूक आहे. माझी मागणी आहे की, ही निवडणूक नोव्हेंबर महिन्यात घ्यावी. महाराष्ट्रासोबत दिल्लीची विधानसभा निवडणूक होऊ दे. जनतेचा निर्णय येईपर्यंत मी मुख्यमंत्रिपद स्वीकारणार नाही. आता जनतेने मला पुन्हा निवडून दिल्यानंतरच मी आणि मनिष सिसोदिया पदांची जबाबदारी स्वीकारु, असे अरविंद केजरीवाल यांनी सांगितले.

केजरीवाल यांच्या जामिनावर कोर्टाच्या कोणत्या ४ अटी

१. अरविंद केजरीवाल मुख्यमंत्री कार्यालयात जाऊ शकणार नाहीत. २. प्रकरणाशी संबंधित कोणतीही सार्वजनिक चर्चा करणार नाही.

३. तपासात अडथळा आणण्याचा किंवा साक्षीदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणार नाही. ४. गरज भासल्यास ट्रायल कोर्टात हजर राहून तपासात सहकार्य करेल.

# राजर्षी शाहूंचं कार्य प्रेरणादायी : डॉ.संजय कळमकर

**कोल्हापूर :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज फक्त कोल्हापूर पुरते मर्यादित नव्हते, तर राज्यभर त्यांच्या कार्याचा आवाका होता. त्यांचं कार्य आजच्या काळासह पुढच्या अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचं प्रतिपादन साहित्यिक डॉक्टर संजय कळमकर यांनी केलं.

राजर्षी शाहू गव्हर्मेंट सर्व्हंट्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या वतीनं राजर्षी शाहू स्मारक भवनात पुरस्कार वितरण आणि सत्कार सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी ते बोलत होते.

यावेळी साहित्यिक डॉ. संजय कळमकर यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याला उजाळा दिला. कार्यकारी अभियंता डी.डी. शिंदे यांनी, विद्यार्थ्यांची गुणवत्ता गुणांवर नव्हे तर त्यांच्या मधील कौशल्यांवर अवलंबून असल्याचं सांगितलं.

यावेळी दिलीप माने यांनीही मनोगत व्यक्त केलं. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते चौथी ते बारावी मध्ये विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसंच पद्माराजे पारितोषिकासह, कैलासवासी छन्नुसिंग चव्हाण पुरस्काराचं वितरण करुन, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष मधुकर पाटील, गटनेते आणि संचालक रवींद्र पंदारे, उपाध्यक्ष अरविंद आयरे यांच्यासह सर्व संचालक आणि सभासद उपस्थित होते.

# गणेश विसर्जनासाठी २०४ कृत्रिम तलाव, महापालिकेची तयारी पूर्ण

मुंबई : येत्या मंगळवारी १७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीला अकरा दिवसांच्या गणेशमुर्तींचे विसर्जन होणार असून त्याकरीता मुंबई महापालिका प्रशसानाची तयारी पूर्ण झाली आहे. विसर्जन सुलभ, निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी मुंबई महानगरपालिकेचे सुमारे १२ हजार अधिकारी - कर्मचारी कार्यरत असतील. तसेच ७१ नियंत्रण कक्ष, ६९ नैसर्गिक विसर्जन स्थळांसह २०४ कृत्रिम तलाव तसेच अन्य विविध सोयीसुविधांची तयारी करण्यात आली आहे.



गणेश विसर्जनासाठी मुंबई महापालिका प्रशासनाने विशेष तयारी केली आहे. महानगरपालिकेच्या विविध खात्यातील कर्मचा-यांमध्ये समन्वय साधण्यासाठी मुख्य नियंत्रण कक्षासह प्रशासकीय विभागांच्या स्तरावर १९२ नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने ६६ निरीक्षण मनोरे उभारण्यात आले आहेत. विविध ठिकाणी ७२ स्वागत कक्ष तयार करण्यात आले आहेत.

गिरगांव चौपाटी येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या डी विभागामार्फत भाविकांसाठी विविध नागरी सेवा-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी यांनी या ठिकाणी भेट देवून रविवारी संपूर्ण व्यवस्थेची पाहणी केली.

आणखी वाचा-पुनर्विकासातील सामान्यांच्या 'म्हाडा' सदनिका अद्याप विकासकांकडेच? सर्वोच्च न्यायालयाकडूनही अहवाल सादर करण्याचे आदेश

अनंत चतुर्दशीदिनी मोठ्या गणेशमूर्तींचे विसर्जन होत असते. त्यामुळे गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी येणारी वाहने चौपाटीवरील वाळूत अडकू नयेत यासाठी चौपाटीच्या किना-यांवर ४७८ स्टील प्लेट तसेच छोट्या गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यासाठी विविध ठिकाणी ४३ जर्मन तराफ्यांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. चौपाट्यांवर सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ७६१ जीवरक्षकांसह ४८ मोटरबोटी तैनात केल्या आहेत, अशी माहिती उप आयुक्त प्रशांत सपकाळे यांनी दिली. विसर्जनापूर्वी भाविकांनी अर्पण केलेले हार, फुले इत्यादी निर्माल्य जमा करण्यासाठी १६३ निर्माल्य कलशांसह २७४ निर्माल्य वाहनांचीही सोय करण्यात आली आहे. आरोग्य विभागाकडून ७५ प्रथमोपचार केंद्रांसह ६७ रुग्णवाहिका देखील सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.